# आदेश नि. क्र. १ खाली एम. जे. सी. क्र. ५०० / २०२५
# दिनांक : ०६/०५/२०२६

प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केले आहे.

**२.** अर्जातील तथ्ये खालीलप्रमाणे :

अर्जदार क्र. १ ते ५ यांची आई, अर्जदार क्र. ६ यांची सासू तसेच अर्जदार क्र. ७ ते १३ यांची आजी नामे मयत **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचा मृत्यू **दि. २७/०८/२०२२** रोजी पारडसिंगा, ता. काटोल, जि. नागपूर येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील, अर्जदार क्र. ६ यांचे सासरे तसेच अर्जदार क्र. ७ ते १३ यांचे आजोबा नामे मयत शामराव राजमल वाघाडे यांचा मृत्यू दि. १५/०८/२००३ रोजी पुसला, ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला आहे. मयत शामराव राजमल वाघाडे व मयत श्रीमती यशोदा शामराव वाघाडे यांचा मुलगा नामे रमेश शामराव वाघाडे यांचा मृत्यू दि. १४/०१/२०२५ रोजी पुसला, ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांना अर्जदार क्र. ६ ही पहिली पत्नी व अर्जदार क्र. ७ ते ११ हे पहिल्या पत्नीपासूनचे अपत्ये कायदेशीर वारस आहेत. तसेच श्रीमती दुर्गा रमेश वाघाडे ही मयत रमेश शामराव वाघाडे यांची दुसरी पत्नी असून अर्जदार क्र. १२ व १३ हे दुसऱ्या पत्नीपासूनचे अपत्ये त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अशाप्रकारे अर्जदार क्र. १ ते १३ हे मयत **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी विद्यमान दिवाणी न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला आहे.

**३.** सदरच्या अर्जावर हरकत नोंदविण्याकरिता स्थानिक दैनिक वृत्तपत्र **दैनिक वरूड दर्पण** मध्ये जाहीर प्रसिद्धी दिनांक **०१/०८/२०२५** रोजी **नि. क्र. २९** अन्वये करण्यात आली. परंतु, त्यावर आजतागायत कोणीही हरकत नोंदविली नाही.

**४.** अर्जदारातर्फे वकील **बी. के. विधळे** यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांची पडताळणी केली.

**५.** अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार क्र. ६ यांनी **नि. क्र. ३२** अन्वये स्वत:चे पुरावा शपथपत्र दाखल करून पुरावा नोंदविला. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ यांची आई, त्यांची सासू तसेच अर्जदार क्र. ७ ते १३ यांची आजी नामे मयत **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचा मृत्यू **दि. २७/०८/२०२२** रोजी पारडसिंगा, ता. काटोल, जि. नागपूर येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील, त्यांचे सासरे तसेच अर्जदार क्र. ७ ते १३ यांचे आजोबा नामे मयत शामराव राजमल वाघाडे यांचा मृत्यू दि. १५/०८/२००३ रोजी पुसला, ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला आहे. मयत

शामराव राजमल वाघाडे व मयत श्रीमती यशोदा शामराव वाघाडे यांचा मुलगा नामे रमेश शामराव वाघाडे यांचा मृत्यू दि. १४/०१/२०२५ रोजी पुसला, ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांना त्या स्वत: पहिली पत्नी व अर्जदार क्र. ७ ते ११ हे पहिल्या पत्नीपासूनचे अपत्ये कायदेशीर वारस आहेत. तसेच श्रीमती दुर्गा रमेश वाघाडे ही मयत रमेश शामराव वाघाडे यांची दुसरी पत्नी असून अर्जदार क्र. १२ व १३ हे दुसऱ्या पत्नीपासूनचे अपत्ये त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते १३ हे मयत **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी विद्यमान दिवाणी न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला आहे.

६. अभिलेखावरील दस्तऐवज **नि. क्र. १०** ते **२९, ३५, ३८** ची पडताळणी केली असता असे दिसून आले की, **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचा मृत्यू **दि. २७/०८/२०२२** रोजी झाला आहे. शामराव राजमल वाघाडे यांचा मृत्यू दि. १५/०८/२००३ रोजी झाला आहे. रमेश शामराव वाघाडे यांचा मृत्यू दि. १४/०१/२०२५ रोजी झाला आहे. अभिलेखावरील उपलब्ध मौखिक व लेखी पुराव्याचे अवलोकन केले. तसेच अर्जावर कोणतीही हरकत नोंदविण्यात न आल्यामुळे अर्जदारांच्या कथनावर अविश्वास करता येणार नाही आणि त्यावरून अर्जदार हे मयत **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचे औपचारिक वारस असल्याचे निष्कर्ष नोंदवित आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये सर्व अर्जदारांना मयताचे वारस घोषीत करून वारस प्रमाणपत्र बहाल करणे न्यायोचीत राहील. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार क्र. १ गणेश शामराव वाघाडे, अर्जदार क्र. २ सौ. रेखा भास्करराव नेहारे, अर्जदार क्र. ३ सौ. बेबी जगन राऊत, अर्जदार क्र. ४ सौ. छबी राजेंद्र राऊत, अर्जदार क्र. ५ सौ. मंदा ओमप्रकाश कोहळे, अर्जदार क्र. ६ श्रीमती शांता रमेश वाघाडे, अर्जदार क्र. ७ सौ. रितीका दुर्गादास चवारे, अर्जदार क्र. ८ रवी रमेश वाघाडे, अर्जदार क्र. ९ सुरज रमेश वाघाडे, अर्जदार क्र. १० राहुल रमेश वाघाडे, अर्जदार क्र. ११ कु. नेहा रमेश वाघाडे, अर्जदार क्र. १२ आशिष रमेश वाघाडे आणि अर्जदार क्र. १३ सौ. अश्विनी विठ्ठल राऊत हे मयत **श्रीमती यशोदा शामराव वाघाडे** यांचे औपचारिक वारस असल्याचे प्रमाणपत्र कायदेशीर मुद्रांक शुल्काचा भरणा केल्यावर प्रदान करण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावली परिच्छेद क्रमांक ३१२ मधील टीप नोंदवावी.

४. सदरहू अर्जदार यांना नियमानुसार कोर्ट फी भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. सदरहू वारस प्रमाणपत्र हे अर्जदार यांना फक्त शासकीय व निमशासकीय कामांकरिता देण्यात येत आहे.

६. प्रकरण निकाली काढण्यात आले.

JAYA SURESHRAO THAKARE

Digitally signed by JAYA SURESHRAO THAKARE
Date: 2026.05.06 16:46:01 +0530

**(श्रीमती जे.एस.ठाकरे)**

दिनांक :– ०६/०५/२०२६

२ रे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
वरूड